# ६-१४ वर्षे या वयोगटातील सर्व मुलांना त्यांचे प्राथमिक शिक्षण (इयत्ता पहिली ते आठवी) पूर्ण होईपर्यंत जवळच्या सरकारी शाळेत मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा हक्क आहे.









सर्व मुलांना सरकारमान्य शाळेत पूर्ण वेळाचे शिक्षण घेण्याचा हक्क आहे. याला अर्धवेळाचे वर्ग/अनौपचारिक शाळा किंवा अनधिकृत शाळा कायदेशीर पर्याय समजले जाणार नाहीत.












सर्व अधिकृत शाळांनी चांगले दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे. या शाळांमध्ये मुला-मुलींकरता वेगवेगळी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, खेळाचे मैदान आणि साहित्य अशा काही मूलभूत सुविधा असल्या पाहिजेत.

मुलांना पुस्तके, गणवेश आणि इतर उपयुक्त वस्तू मोफत मिळाल्या पाहिजेत.









इयत्ता पहिली ते चौथीतील मुलांकरता राहण्याच्या जागेपासून जर शाळा एक किलोमीटरपेक्षा दूर असेल आणि इयत्ता पाचवी ते आठवीतील मुलांकरता राहण्याच्या जागेपासून जर शाळा तीन किलोमीटरपेक्षा दूर असेल तर या मुलांची शाळेत नेण्या–आणण्याची सोय केली गेली पाहिजे.





इयत्ता पहिली ते पाचवी करता २०० कामाचे दिवस आणि ८०० शिकवण्याचे तास असलेच पाहिजेत.

इयत्ता सहावी ते आठवी करता २२० कामाचे दिवस आणि १००० शिकवण्याचे तास असलेच पाहिजेत.












प्राथमिक इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गांकरता दर ३० विद्यार्थ्यांमागे किमान एक शिक्षक असला पाहिजे.

उच्च-प्राथमिक इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांकरता, दर ३५ विद्यार्थ्यांमागे किमान एक शिक्षक असला पाहिजे.

अधिकृत शाळांतील सर्व शिक्षक २०१५ पर्यंत अर्हताप्राप्त झाले असले पाहिजेत.












सर्व शाळांनी आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या वंचित वर्गातील मुलांकरता आणि अपंग मुलांकरता २५% मोफत जागा आरक्षित केल्या पाहिजेत. यात खाजगी विना-अनुदानित आणि अल्प-अनुदानित शाळा, त्याचप्रमाणे केंद्रिय विद्यालये, नवोदय विद्यालये आणि सैनिकी शाळा या विशिष्ट वर्गातील शाळांचाही समावेश आहे.









कोणत्याही शाळेने देणग्या अगर कॅपिटेशन फी आकारू नयेत.

प्रवेश देण्याकरता मुलांची चाचणी किंवा पडताळणी केली जाऊ नये.

मुलांची अगर पालकांची मुलाखत घेतली जाऊ नये.





शाळेत कोणत्याही मुलाला शारीरिक शिक्षा अगर मानसिक छळाला सामोरे जावे लागू नये.

कोणत्याही मुलाला एकाच इयत्तेत परत बसवले जाऊ नये.

प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मुलाला शाळेतून काढून टाकण्यात येऊ नये.





सरकारी शाळांमध्ये मुख्यत्वे पालकांची मिळून बनलेली शाळा व्यवस्थापन समिती असली पाहिजे.

शाळेच्या कामकाजावर आणि शाळेला मिळणाऱ्या आर्थिक मदतीच्या विनियोगावर लक्ष ठेवणे आणि शाळा विकास आराखडा बनवणे ही या शाळा व्यवस्थापन समितीची मुख्य कार्ये असतील.









# या कायद्याच्या अंमलबजावणीची मुख्य जबाबदारी राज्य सरकारची आणि स्थानिक पातळीवरच्या महानगरपालिकांसारख्या संस्थांची आहे.





राष्ट्रीय बाल सुरक्षा हक्क आयोग (एनसीपीसीआर) आणि प्रत्येक राज्य बाल हक्क सुरक्षा आयोग (एससीपीसीआर) हे या कायद्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याकरता आणि या कायद्याचा भंग झाल्याबाबतच्या तक्रारींची चौकशी करण्याकरता जबाबदार आहेत.



